

# -: श्री. संत जनाबाई :-

तिची वेंणीफणी करायला 'विठ्ठल' येई, तिला पाणी भरण्यात, दळणकांडण करण्यात विठुमाऊली तत्पर असे. तिने थापलेल्या गोवऱ्यात तो वसे अशी ही जनाबाई कोण होती? ती होती एक सामान्य स्त्री जी आपल्या श्रेष्ठ भक्तीने संतपदाला पोहचली.

अंदाजे १२५८ साली परभणी जिल्ह्यातील गोदावरी काठच्या गंगाखेड इथे 'दामा' व 'करूंड' या दांपत्याच्या पोटी "जनाईचा" जन्म झाला. तिचे आईवडील दोघेही विठ्ठलभक्त होते. लहानपणीच तिला वडिलांनी पंढरपूरच्या नामदेवांच्या कुटुंबात नोकरीसाठी पाठवले. ती त्यांच्या कुटुंबातील एक घटक बनली.

आईवडिलांपासून दूर राहून नामदेवांच्या घरी कष्ट करणाऱ्या जनाबाईंच्यात कवित्व गुण उपजत होते. श्रेष्ठ भक्तिभाव होता. स्वतःला 'नामयाची दासी' म्हणून घेऊ लागल्या. त्यांच्या मनातील श्रेष्ठ गुरुभाव ही त्यांची शक्ती होती म्हणून नामदेवांच्या भक्तीमार्गाच्या पाऊल खुणांवरून प्रवास केला तो अखेरच्या क्षणापर्यंत.

जनाबाईंच्या काळात ज्ञानेश्वर माउली, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताई, नामदेव, गोरा कुंभार, चोखामेळा, सेनामहाराज अशी संतांची मांदियाळीच होती. म्हणून जनाबाईंनी विठ्ठलाला, 'विठू माझा लेकुरवाळा' म्हणत लेकुरवाळे बनवले.

त्या सर्व संतांच्या जीवनाचा, सद्‌गुणांचा आढावा घेणारी पद्यरचना करून जनाबाईंनी महान कार्य केले आहे. त्यांच्या अभंगांची भाषा सर्वसामान्यांच्या हृदयाला भिडणारी आहे. वात्सल्य, कोमलता, सहनशीलता, त्यागी वृत्ती या भावना त्यांच्या काव्यात प्रकर्षाने जाणवतात. त्यांच्या मनात विठ्ठलविषयी श्रेष्ठ भक्तिभाव तर आहेच पण वेळप्रसंगी त्या विठ्ठलाशी भांडायलाही कमी करत नाहीत.'धरिला पंढरीचा चोर,गळा बांधुनिया दोर' म्हणत त्याला चोरही बनवतात.

जनाबाईची महती ऐकून एकदा संत कबीर तिला भेटायला पंढरपुरास आले. ती त्यावेळी गोपाळपूरास गोवऱ्या थापायला गेली होती. कबिरदास तिथे गेले तर  गोवऱ्यांचा ढीगं मध्ये ठेवून दोन स्त्रिया भांडत होत्या. कबिरांना प्रश्न पडला ही जनाबाई असेल? त्यांनी प्रश्न विचारला, ''जनाबाई कोण? आणि तुम्ही का भांडताय?'' दुसऱ्या स्त्रीने जनीकडे बोट दाखवले व म्हटले, ''हीच जनीं, गोवऱ्या वरून भांडतेय'' तिने कबिरांना सांगितले की, ''तुम्हीच तिच्या व माझ्या गोवऱ्या निवडून द्या''.

कबिरांना प्रश्न पडला एकसारख्या गोवऱ्यातून वेगळ्या कशा निवडायच्या? त्यावर जनाबाईने हे काम सोपे आहे असे सांगितले. ते कसे तर ती म्हणाली, ''गोवरी कानाला लावा. ज्यातून विठ्ठल-विठ्ठल असा ध्वनी येईल ती गोवारी माझी''. त्याप्रमाणेच झाले आणि जनाबाईंच्या गोवऱ्या जास्त जमल्या. कारण जनाबाई गोवऱ्या थापताना सतत विठ्ठलाचे नाम घेत तल्लीन होऊन जात असे. कबिरांना तिची महती पटली.

जनाबाई एक सामान्य स्त्री पण नामदेवांची दासी ते श्रेष्ठ विठ्ठलभक्त असा प्रवास करत अलौलिक अभंग रचना करून अमर झाली. आजही खेडोपाडी तिचे अभंग गायले जातात. जनाबाईंची भक्ती ही प्रत्येक कसोटीवर खरी उतरणारी होती. सकल संत गाथेमध्ये जनाबाईंचे ३५० अभंग आहेत.

अशी ही 'दासी'ते संतपदाला पोहोचणारी जनाबाई इ.स. १३५० मध्ये आषाढ कृष्ण त्रयोदशीला संत नामदेवांच्या पाठोपाठ पांडुरंग चरणी विलीन झाली.

- सौ. माधुरी मोहन साने, कराड

व्यक्तिरेखा -

१. संत जनाबाई - सौ.श्वेता देसाई .

२. संत कबीर - श्री. के. एन. देसाई सर.

३. गावकरी - सौ. शर्मिला गुज्जेट्टी.

श्री. प्रथमेश कुलकर्णी.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. सौ. जयश्री देशपांडे.
४. श्री. आमित पाटील.
५. श्री. महेश पुजारी.
६. श्री. ओमकार पाटील.
७. श्री. आशुतोष गोळे.
८. श्री. हिमांशू आफळे.
९. सौ. रिद्धी नलवडे.

लोकेशन -

पावकेश्वर महादेव मंदिर, सैदापूर, कराड.

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.

२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. शंतनू देशमुख.

२. श्री. अद्वैय मुंढे.

३. श्री. आमित पाटील.

४. श्री. महेश पुजारी.

५. श्री . आशुतोष गोळे.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन -

  सौ. माधुरी मोहन साने, कराड.
- लेख संकलन -

  -श्री. दीपक आफळे.
- ध्वनीमुद्रण - सौ. स्वप्नजा बर्वे.
- ध्वनिमुद्रिका -